सुप्रभात

हिंदुस्थान

भारतीय सौर २३ फाल्गुन १९४५

# द्वितीय मुखपृष्ठ

epaper : dainikhindusthan.com
email : dainikhindusthan@gmail.com
twitter : twitter.com/HindusthanAmt

**सुविचार**

शत्रूने केलेले कौतुक हीच आपली सर्वोत्तम कीर्ती होय.

अमरावती, बुधवार १३ मार्च, २०२४

**अमरावती हवामान**

**बुधवारचा अंदाज**
कमाल : ३३ किमान २०

| | |
|---|---|
| नागपूर | : कमाल ३३ किमान २० |
| पुणे | : कमाल ३३ किमान १५ |
| मुंबई | : कमाल ३२ किमान २३ |
| अकोला | : कमाल ३३ किमान १९ |
| यवतमाळ | : कमाल ३२ किमान २१ |
| वाशिम | : कमाल ३३ किमान २१ |

# पांढरीत यापुढे कुठलेही प्रवेश दार लावू नये; ग्रामसभेत सर्वांमध्ये ठराव मंजूर

## अगोदरचे दोन्ही ठराव रद्द करण्याचा ग्रामसभेत झाला ठराव

### प्रवेशद्वार काढण्याचा निर्णय ग्रामपंचायत घेईल : जिल्हाधिकारी सौरभ कटियार

पांढरी खानापूर येथील गावातील मुख्य रस्त्यावरील डॉ. बाबासाहेब आंबेडकर वादग्रस्त प्रवेशद्वारावरून कायदा आणि सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण झाल्याने सदर वादग्रस्त प्रवेशद्वार काढण्याचा निर्णय जिल्हा प्रशासन का घेत नाही याबाबत पत्रकारांनी जिल्हाधिकाऱ्यांना विचारणा केली असता सदर प्रवेशद्वार काढण्याबाबत ग्रामपंचायत निर्णय घेईल त्या बाबत योग्य ते सहकार्य जिल्हा प्रशासन करेल असे जिल्हाधिकारी सौरभ कटियार यांनी पत्रकारांना सांगितले.

अंजनगाव सुर्जी दि. १२ : गेल्या दीड महिन्यापासून पांढरी खानमपूर येथील प्रवेशद्वारासंबंधी दोन गटात चालत आलेला वाद आणि त्यानंतर सोमवारी (दि.११) अमरावती येथे आयुक्त कार्यालयासमोर घडलेल्या प्रकारानंतर आज मंगळवारी (दि.१२) पांढरी खानापूर गावात ग्रामसभा झाली असून या ग्रामसभेत यापुढे गावात कुठलेही प्रवेशद्वार लावू नये तसेच २०२० व २०२४ ला घेतलेले दोन्ही ठराव रद्द करण्यात यावेत असा ठराव आज झालेल्या ग्रामसभेत सर्वानुमाते मंजूर झाला असून यावेळी गावातील बहुतांश महिला पुरुष ग्रामसभेत उपस्थित होते हे विशेष.

तालुक्यातील पांढरी खानमपुर गावात मुख्य रस्त्यावर डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचे नावाचे प्रवेशद्वार लावण्याचा ठराव २६ जानेवारी २०२० ला व २६ जानेवारी २०२४ ला ग्रामसभेत पारित करण्यात आल्यानंतर ३१ जानेवारी २०२४ ला गावकऱ्यांनी उभारलेल्या तात्पुरत्या प्रवेशद्वारानंतर दोन गट आणणे सामने येऊन प्रवेशद्वाराचा मुद्दा पांढरी येथून आयुक्त कार्यालय अमरावती येथे पोहोचला ज्याचा उद्रेक सोमवारी दि. ११ ला आयुक्त कार्यालयासमोर झाला आंदोलकांनी केलेल्या दगडफेकीनंतर आंदोलकांवर झालेल्या लाठीचार्ज नंतर आज मंगळवारी (दि.१२) पांढरी येथे सकाळी साडेनऊ वाजता आयोजित केलेली ग्रामसभा पार पडली यावेळी सकाळी साडेआठ वाजता पासूनच गावातील महिला पुरुष ग्रामसभा आयोजित केलेल्या ठिकाणी गोळा व्हायला सुरुवात झाली होती आणि साडेनऊ वाजता ग्रामसभा सुरुवात होऊन २६ जानेवारी २०२० व २६ जानेवारी २०२४ चा मुख्य प्रवेश दर बांधकामासाठी दिलेल्या ठराव रद्द करण्यात आला यावेळी ग्रामसभेत सरपंच सुषमा पाटील ,उपसरपंच शेख जाबीर शेख रहुफ सचिव सुधीर याउल ग्रामपंचायतचे ग्रामपंचायतचे सदस्यांसह गावातील एकूण १४४४ महिला पुरुष नागरिक सभेला उपस्थित होते.

सदरचे ठराव मध्ये यापुढे गावात कुठल्याही प्रवेशद्वार बांधण्यात येऊ नये असाच ठराव सर्वानुमते पारित झाल्याने पांढरे येथील प्रवेशदराचा विषय बंद होईल की पुन्हा उफाळून येईल याकडे संपूर्ण जिल्ह्याचे लक्ष लागले आहे.

सध्या स्थिती पांढरी खानमपूर गावात शांत स्थिती असून जवळपास ४०० च्या जवळपास पोलीस बंदोबस्त लावण्यात आला असून पांढरी गावात दुपारी चार वाजता जिल्हाधिकारी व संबंधित सर्व विभागाचे अधिकारी हे पांढरी गावात दाखल झाले असून कायदा व सुव्यवस्था च्या दृष्टीने गावातील नागरिकांसोबत चर्चा समन्वय घडविण्याचा प्रयत्न करत असल्याचे जिल्हाधिकारी सौरभ कटियार यांनी सांगितले.

# देशाच वाटोळ करुन घ्यायच असेल तर पुन्हा नरेन्द्र मोदींना सत्ता द्या

## शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी केंद्र सरकार व राज्यसरकारवर केले प्रहार

राळेगांव दि.१२ : देशातील सर्वसामान्य लोकांना भूल थापा व खोटे आश्वासन देऊन सत्तेवर आलेले मोदींचे हुकूमशाही सरकार या येणाऱ्या लोकसभेच्या निवडणुकीत उलटून टाका व गद्दारी करून सत्तेत बसलेल्या शिंदे सरकारला त्यांची जागा दाखवून दिलेल्या शिवाय हा सामान्य शिवसैनिक व मी पक्षप्रमुख स्वस्थ बसणार नाही. संपूर्ण देशाचं व तुमचं वाटोळ करणार आहे. मोदी यांच्या सरकार तुम्हाला पुन्हा निवडून द्यायचं की याला तडीपार करायचं हे तुम्ही ठरवा. सध्याचा काळ हा ईडीचा आहे माझं सरकार पाडलं आणि शिंदे सह ४० आमदार गद्दार झाले ही गद्दारी येणाऱ्या निवडणुकीत गाळून टाकायची आहे हा शिवरायांचा महाराष्ट्र आहे असे उद्धव ठाकरे म्हणाले.

महाराष्ट्रातील आपल्या जिल्ह्यातील शेतकरी आत्महत्या करतो आहे महाराष्ट्रात सर्वात जास्त आत्महत्या जिल्ह्यात झाल्याची नोंद आहे. तुमच्या कापसाला सोयाबीनला कांद्याला दुधाला भाव नाही शेतकऱ्याची कर्जमाफी करण्याचे आश्वासन देणाऱ्या सरकारने एक तरी रुपयाची कर्जमाफी केली काय हा सवाल त्यांनी केला. मोदींना राखी बांधणाऱ्या तुमच्या खासदार सध्या कुठे आहे त्यांनी या मतदार संघासाठी सामान्य माणसासाठी लोकसभेत काय केलं याचे उत्तरही तुम्ही मागितलं पाहिजे त्याचं उत्तर त्या देऊ शकणार नाही. अदानी अंबानीच्या हिताचे सरकार आहे महाराष्ट्रातील सर्व उद्योगधंदे गुजरातला पळवणार हे छोटं सरकार आहे माझा पक्ष चिन्ह बापही चोरला तरी माझ्यावर फार फरक पडला नाही कारण माझ्यासोबत तुमच्या सारखी सामान्य मायबाप जनता आहे माझ्या आजोबा पणजोबा वडिलांनी दिलेलीही पुण्याई आहे, असे प्रतिपादन आज राळेगाव येथे झालेल्या सभेत उबाठा गटाचे पक्षप्रमुख उध्दव ठाकरे यांनी केले.

कोणाचा बाप सोडून मोठा होता येत नाही येणाऱ्या निवडणुकीत यांना धूळ चारल्याशिवाय स्वस्त बसू नका काँग्रेसने देश बुडवला असे म्हणणा?यांनी देश विकायला काढला आहे अशी टीका माजी मुख्यमंत्री व शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे गटाचे पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी राळेगाव येथे आयोजित जनसंवाद मिळाव्यात दिनांक १२ मार्च २०२४ ला दुपारी दोन वाजता गांधी लेआउटच्या मैदानात भरगच्च लोकांच्या उपस्थितीत केली विधान परिषदेचे विरोधी पक्ष नेते अंबादास दानवे यांनी खासदार भावना गवळी यांच्यावर टीका करताना निष्क्रिय खासदार असा उल्लेख केला देशातील पंतप्रधान नरेंद्र मोदी व देशाचे गृहमंत्री अमित शहा हुकुमशहासारखे वागत आहे महाराष्ट्रातील ट्रिपल इंजिनचे सरकार काय कामाचे ईडीच्या धाकाने तयार झालेल्या ट्रिपल इंजिन फार काळ टिकणार नाही हे कुठल्याही विचार अप्रतिम प्रामाणिक नाही असेही दानवे म्हणाले प्रत्येक शिवसैनिक हा उद्धव ठाकरे पक्षप्रमुख यांच्या विचाराप्रती प्रामाणिक आहे तो बाळासाहेबांच्या भगवाधारी विचार डोक्यात घेऊन चालणार आहे मतदारसंघातील सिंचनाचा प्रश्न बेरोजगारीचा प्रश्न आदिवासी भागातील वाड्यावर त्या तांडे यांच्या विकासाचा प्रश्न पाण्याचा प्रश्न सोडवण्यात विद्यमान खासदार अपयशी ठरले असून सध्याचे सरकार सुद्धा अपयशी असल्याची टीका त्यांनी यावेळेस केली आणि त्यांची जागा येणा?या निवडणुकीत त्यांना दाखवून द्या असे आवाहन केले

जनसंवाद मिळाव्याचे प्रास्ताविक कार्यक्रमाचे आयोजक माजी मंत्री संजय देशमुख यांनी केले. त्यांनी प्रास्ताविकात वाशिम यवतमाळ लोकसभा मतदारसंघातील समस्यांचा पाढा वाचून दाखवला आणि विद्यमान खासदार या निष्क्रिय आहेत. सध्याचे सरकार कसं भ्रष्ट आहे हे उपस्थित त्यांना समजावून सांगितले.

शहरात उद्धव ठाकरे यांचा आगमन होताच ढोल ताशांनी त्यांचे स्वागत झाले सार्वजनिक बांधकाम विभागाच्या जवळील शिवतीर्थ या ठिकाणी उद्धव ठाकरे यांनी भेट देऊन छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्याचे पूजन केले. यानंतर कृषी उत्पन्न बाजार समिती राळेगाव या ठिकाणी जाऊन तिथल्या संचालक मंडळाला सदिच्छा भेट दिली. क्रांतिवीर बाबुराव शेडमाके यांच्या प्रतिमेचे पूजन केले. जनसंवाद मेळाव्याला शिवसेना सचिव मिलिंद नार्वेकर, संवाद मेळाव्याचे आयोजक संजय देशमुख, वाशिम यवतमाळ लोकसभा मतदारसंघाचे निरीक्षक कॅप्टन प्रशांत सुर्वे, शिवसेना जिल्हाप्रमुख जिल्हा संपर्कप्रमुख राजेंद्र गायकवाड, जिल्हाप्रमुख किशोर इंगळे, माजी आमदार बाळासाहेब मुनगीनवार, माजी आमदार विश्वास नांदेकर, संजय देरकर, संतोष ढवळे, संजय रंगे, गजानन डोमाळे, दिगंबर मस्के, राजेश मांडवकर, तिरुपती परिवार, गजानन पांडे, नाना धानफुले, राळेगाव तालुका प्रमुख विनोद काकडे, शहर प्रमुख इम्रान पठाण, योगेश मुलुंडे, यांच्यासह जिल्ह्यातील उद्धव बाळासाहेब ठाकरे सेनेचे पदाधिकारी कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे आभार आयोजकांनी मानले. लोकांची मोठ्या प्रमाणात गदी असल्याने जनसंवाद मेळावा यशस्वी झाल्याची चर्चा सर्वत्र पाहायला मिळत आहे.

# चांदूरबाजार तहसिल कार्यालयाची मुख्य इमारत झाली वाहनतळ

## नागरिकांना कार्यालयात जातांना करावी लागते कसरत

**(सागर सवळे)**

चांदूरबाजार दि. १२ : चांदूरबाजार येथे शासनाने कोट्यावधी रुपये खर्च करून अत्यंत देखणी आणि सुंदर अशी तहसिल कार्यालयासह विविध विभागाचे कार्यालयांचा समावेश असलेली सचिवालयाची इमारत उभारली असून ही इमारत शहराच्या सौंदर्य मध्ये भर घालत आहे. परंतु या सुंदर आणि देखण्या इमारतीवर प्रशासनाचे दुर्लक्ष व नागरिकांच्या बेशिस्तपणा मुळे विद्रुप होण्याची वेळ आली आहे. या इमारतीच्या मुख्य प्रवेशद्वाराच्या आतील परिसरातील तहसिल कार्यालयात कामानिमित्त येणारे नागरिक हे आपली दोनचाकी वाहने अस्तव्यस्त उभी करत असून या इमारतीच्या अगदी समोरच मोठ्या प्रमाणात दोन चाकी वाहनाच्या रांगाचं रांगा दिसत असल्याने ही इमारत तहसिल कार्यालयाची आहे की वाहनतळा साठी उभारली? असा प्रश्न सामान्य नागरीकांना पडला.या वाहनांमुळे नागरिकांना कार्यालयात जाताना अडचणीचा सामना करावा

लागत असल्याने कामासाठी कार्यालयात जातांना कसरत करावी लागते.वाहन इतके अस्तव्यस्त लावले असतात की तहसीलदार यांच्या शासकीय वाहनास उभे राहण्याकरिता सुद्धा जागा राहत नसल्याचे दिसून येते. या प्रशस्त अश्या इमारतीमध्ये दोन चाकी आणि चार चाकी वाहन उभे करण्यासाठी वाहन ठेवण्यासाठी शेड उभारण्यात आलेले आहे परंतु या शेड मध्ये तहसिल कार्यालयाअंतर्गत कामे करणार्या लाभार्थ्यांची कागदपत्रे तयार करणारे खाजगी अर्जनविस बसलेले दिसतात. आणि मुख्य प्रवेशद्वाराचे आत संपुर्ण तहसिल कार्यालय परिसरात शेकडो वाहनाच्या रागाचं रांगा दिसून येतात याला जबाबदार कोण ? या वाहन उभे करणाऱ्यांवर प्रतिबंध कोण लावणार? वाहने उभी करणार्यांनीही तहसिल परिसरात वाहने उभी करतांना आपल्या वाहनामुळे इतरांना त्रास होणार नाही या जबाबदारीची जाणीव ठेवण्याची गरज आहे. नागरिकांच्या या बेशिस्तपणाला आळा घालण्यात येऊन या इमारती समोर वाहने उभी करण्यास मज्जाव करण्यात यावा आणि पार्किंग शेड मध्येच वाहने उभी करण्याची सक्ती नागरिकांना करण्यात यावी अशी मागणी करण्यात येत आहे ही वाहने इतक्या मोठ्या प्रमाणात उभी करण्यात येते की कधी कधी तहसीलदारांना सुद्धा आपल्या केबिन मध्ये जाताना त्रास सहन करावा लागतो त्यामुळे यावर वेळीच उपाय योजना करण्याची मागणी नागरिकांनी केली आहे.

# भरधाव दुचाकीने युवकाला उडवले

## दुचाकीस्वारासह युवक गंभीर जखमी

तिवसा दि. १२ : तालुक्यातील वाठोडा खुर्द नजीक राज्य मार्गावरून पायदळ जात असलेल्या एका युवकाला मागून येणाऱ्या भरधाव दुचाकीने जबर धडक दिली. यात युवकासह दुचाकीस्वार गंभीर जखमी झाले असून त्यांना प्रथम तिवसा उपजिल्हा रुग्णालय त्यानंतर अमरावती जिल्हा रुग्णालयात उपचारासाठी हलविण्यात आले.ही घटना काल रविवार दि.११रोजी रात्री ९वाजता दरम्यान घडली.

किरण मारोतराव निखाडे वय २२. रा पेठरघुनाथपूर मंगरूळ दस्तगीर.तर दुचाकीस्वार राजकुमार मठण धुर्वे वय ३०रा. छिदवाडा (म. प्र.)असे अपघातात जखमी झालेल्याची नाव आहे.

मंगरूळ दस्तगीर येथून किरण निखाडे, यांच्यासह आठ ते दहा मजूर हे वाठोडा मौजातील एका शेतात संत्रा भरण्यासाठी आले होते. यावेळी रात्री उशिरा झाल्यामुळे सर्व मजुरांनी शेतातच मुक्काम केले. रात्री जेवण करून किरण निखाडे आपल्या दोन मित्रासह रस्त्यावरून फिरत असताना मागून येणाऱ्या राजकुमार धुर्वे याच्या दुचाकीने जबर धडक दिली. यात श्री. निखाडे यांच्या पाय,हाताला डोक्याला गंभीर दुखापत झाली तर दुचाकीवर असलेले राजकुमार धुर्वे यांना ही डोक्याला मार लागल्यामुळे त्यांना रुग्णवाहिकेने तिवसा उपजिल्हा रुग्णालय दाखल करण्यात आले मात्र दोघांची प्रकृती गंभीर असल्यामुळे त्यांना पुढील उपचारासाठी अमरावती जिल्हा रुग्णालयात हलविण्यात आले..

**झाडे लावा झाडे जगवा**

# सहकार मेळावा मोठ्या उत्साहात

अमरावती,दि.१२ : सहकार भारती अमरावती जिल्हा तर्फे सहकार मेळाव्याचे आयोजन शनिवार दि.२ मार्च रोजी रजनी मंगल कार्यालय रेवसा फाटा महापारायण चौक वलगाव रोड अमरावती येथे करण्यात आले. जिजाऊ कमर्शियल को ऑपरेटिव्ह बॅकेचे क्रियाशील अध्यक्ष अविनाश कोठाळे साहेब यांनी कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान भुषविले.

प्रमुख अतिथी माजी मंत्री जगदीश गुप्ता, जिल्हा उपनिबंधक शंकर कुंभार, उपनिबंधक सहकारी संस्था पतंगे, व्यवस्थापक यवतमाळ अर्बन को. ऑप .बॅक पवन जोशी,सहकार भारती अमरावती जिल्हाचे अध्यक्ष रामेश्वर विधळे, ॲड. भोंड साहेब अकोला हे व्यासपीठावर विराजमान होते. व्यासपीठावरील मान्यवरांनी भारतमाता व सहकार भारतीचे संस्थापक लक्ष्मणराव इनामदार यांचे प्रतिमेचे पुजन व दिप प्रज्वलन केले. सहकार गीताने कार्यक्रमाची सुरूवात झाली. व्यासपिठावरील सर्व मान्यवरांचा सहकार भारती अमरावती जिल्हा चे मुख्य पदाधिकारी यांचे हस्ते शाल, श्रीफळ, सन्मानचिन्ह व पुष्पगुच्छ देवुन यथोचित सत्कार करण्यात आला. यानंतर कार्यक्रमाचे प्रास्ताविक सहकार भारतीचे जिल्हाध्यक्ष रामेश्वर विधळे यांनी केले.

व्यासपिठावरील मान्यवरांनी सहकार विभागातील बॅक,पतसंस्था व गृहनिर्माण संस्था याचे करिता उपयोगी अशा विषयाबाबत मार्गदर्शन केले.यामधे सहकार विभागामधे नवीनच निर्माण झालेले नियामक मंडळ, पतसंस्थेचे व्यवस्थापन आणि कर्ज वाटप, नागरी सहकारी बँकासमोरिल आवाहने व उपाय,पतसंस्थांचा विकास व भवितव्य याविषयी विस्तृत व उपयुक्त माहिती दिली. सहकार मेळाव्यास उपस्थितांनी विचारलेल्या प्रश्नांची समर्पक उत्तरे कुंभार साहेब जिल्हा उपनिबंधक ,सहकारी संस्था अमरावती यांनी देवुन सर्वांचे समाधान केले. सभेत नुकत्याच पार पडलेल्या बॅक व पतसंस्थेमधे निवडून आलेल्या पदाधिकारी व संचालक यांचा सत्कार करण्यात आला. यामध्ये जिजाऊ कमर्शियल को ऑपरेटिव्ह बॅक अमरावतीचे अध्यक्ष अविनाश कोठाळे,उपाध्यक्ष प्रदिपराव चौधरी, संचालक प्रा.अनिल बंड,बबनराव आवारे, नितीन डहाके, डॉ. गौरव विधळे, प्रा.सुनिल चाफले, अरविंद गावंडे, प्रशांत गावंडे, महात्मा फुले अर्बन को ऑप.बॅकेचे संचालक मनोज भेले, अमरावती मर्चंट को ऑप. बॅकेचे अध्यक्ष अनिल जवंजाळ, अभिनंदन बॅकेचे मुख्य कार्यकारी अधिकारी शिवाजी देठे, बहुउद्देशिय नागरी पतसंस्थेचे अध्यक्ष प्रकाशराव बोके, हितगुज महिला संस्थेच्या अध्यक्षा शोभा गायकवाड,सामान्य रुग्णालय कर्मचारी पतसंस्थेच्या अध्यक्षा श्रीमती भोरे, सहकार भारतीच्या महिला अध्यक्षा आशा दाभाडे, उपाध्यक्षा भावना जोशी, सहकार भारतीचे जेष्ठ नेते भुसारी साहेब, यांचा शाल,श्रीफळ, सन्मानचिन्ह व पुष्पगुच्छ व्यासपिठावरील मान्यवरांचे हस्ते देवुन सत्कार करण्यात आले.

या सहकार मेळाव्यास सहकार भारतीचे यवतमाळचे विभागीय सह प्रमुख अमित भिसे, सहकार सुगंध मासिकाचे प्रमुख प्रचारक गावंडे, साकुरे, बँक, पतसंस्था व सहकार क्षेत्रातील विविध संस्थाचे पदाधिकारी, संचालक व कर्मचारी वृंद मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे संचालन सहकार भारती अमरावती जिल्हाचे महामंत्री दामोदर पवार यांनी केले. सहकार गीत व आभारप्रदर्शन विश्वकर्मा पोस्टल कर्मचारी पतसंस्थेचे अध्यक्ष रमेश टेंभरे यांनी केले. कार्यक्रमाचे यशस्वीते साठी सहकार भारती अमरावती जिल्हाचे मुख्य पदाधिकारी शहराध्यक्ष सतिश क्षीरसागर, प्रदीप मोहणे संघटक, दिलीप विधळे शहर संघटक, उपाध्यक्ष नारायणराव शेरेकर,सदस्य भाष्कररव रिठे यांनी मोलाचे प्रयत्न केले. राष्ट्रगितानंतर सहकार मेळाव्याची सांगता झाली.

॥ श्री दत्त गुरु ॐ, श्री दादा गुरु ॐ ॥॥ श्री दत्त गुरु ॐ, श्री दादा गुरु ॐ ॥॥ श्री दत्त गुरु ॐ, श्री दादा गुरु ॐ ॥॥ श्री दत्त गुरु ॐ, श्री दादा गुरु ॐ ॥

॥ श्री दादा गुरू नमः ॥

"जय श्री दादाजी की"

" दादा सबका भला करे "



प्रतिष्ठाण:
बापू खादी भंडार
बापू मेन्स वेअर
जुना गड्डा हॉटेल, राजकमल चौक
अमरावती मो.९८२२२८९३१४

॥ श्री गणेशाय नमः ॥ ॥ श्री चावंडा माताय नमः ॥

॥ निमंत्रण ॥

भक्तगण,
प.पू. १००८ श्री धुनिवाले दादाजी (खण्डवा)
की असीम कृपा से हमारे यहाँ
"श्री दादाजी के प्रसाद" पर आयोजित
भजन किर्तन (श्री रामदेव बाबा भक्त मंडली, अम.)
फागन सुदी चतुर्थी बुधवार, दि. १३/३/२०२४ को
रात ९ बजे आयोजित किया है।
आप सभी महानुभाव इसका लाभ लेवे।
विनीत :

विजयदादा उपाध्याय
सौ. कंचन विजय उपाध्याय
माजी नगरसेविका (भाजपा)

स्थान :- "श्री दादाजी कृपा" ब्राम्हणवाडी, भाजी बाजार, अमरावती फोन : २५७९९७८

॥ श्री दत्त गुरु ॐ, श्री दादा गुरु ॐ ॥॥ श्री दत्त गुरु ॐ, श्री दादा गुरु ॐ ॥॥ श्री दत्त गुरु ॐ, श्री दादा गुरु ॐ ॥॥ श्री दत्त गुरु ॐ, श्री दादा गुरु ॐ ॥